MHND270007002021

**नि.दि.दा.क्र.६८/२०२१**
**प्रयागबाई व ईतर वि. रामदेव व ईतर**

# निशाणी क्र.५ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी सादर केलेला आहे.

२. अर्ज वाचला. वादीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर अर्जाला व मूळ दाव्यास उत्तर दिलेले नाही. त्यामुळे दावा व अर्ज त्यांच्या विरुध्द विना जबाब चालविण्यात आला.

४. वादीच्या कथनांवरुन व सादर केलेल्या कागदपत्रांवरुन खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांना मी पुढील कारणमिमांसेद्वारे उत्तरीत केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी दावा वादीच्या बाजुने आहे काय? | होय. |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | होय. |
| ३) | जर तात्पूरता मनाई हुकूम दिला नाही तर वादींचे कधीही न भरून निघणारे नुकसान होईल काय? | होय. |
| ४) | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीताः**

**५.** सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची उत्तरे मी एकत्रित नोंदवित आहे.

**६.** वादीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, वादी क्र.१ व २ व प्रतिवादी यांच्या एकत्रीत हिंदू कुटुंबाचे सर्वे क्र.१७४–ब, गट क्र.५५२ मध्ये प्लॉट क्र.४५ ज्याचा नगर परीषद मालमत्ता क्र.१०–३–१३९ असा मौजे मुदखेड येथे स्थित आहे. सदरचा प्लॉट वादी क्र.१ चे पती सुगुंधचंद समुंदर यांनी त्यांना घशाचा कर्करोग असल्यामुळे भविष्यातील कुटुंबातील कर्ता पुरुष म्हणून प्रतिवादी क्र.१ च्या नावे दि.०७.०९.१९८७ रोजी घेतला होता. तो प्रतिवादी क्र.१ हा कोणतेही कामधंदा करीत नाही. वादी क्र.१ च्या पतीचे निधन झाले आहे. तसेच वादी क्र.२ ही तिला तिच्या पतीने घरातून हाकलून दिल्यामुळे तिच्या आई सोबत राहत आहे. प्रतिवादी क्र.१ चा प्रतिवादी क्र.२ शी विवाह झाल्यानंतर त्यांच्यामध्ये भांडण झाले व त्यांनी वादींना त्रास देण्यास सुरुवात केली. दरम्यानच्या काळात वादी यांची कामे बंद पडल्यामुळे त्यांना आर्थीक अडचण निर्माण झाली. त्यावेळी वादी क्र.१ चे भाऊ राम नारायण वर्मा यांनी त्यांना आर्थीक मदत केली व प्रतिवादी क्र.१ च्या नावे असलेल्या दावा मिळकतीवर घर बांधून दिले. दरम्यान राम नारायण यांचे सुध्दा निधन झाले. त्यानंतर वादी एका खोलीमध्ये राहत असत व उर्वरित खोल्या किरायाने देवून त्यातून येणा–या उत्पन्नातून त्यांचा उदरनिर्वाह करीत असत. घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ हा त्या घरी राहण्यास आला व त्याने किरायाने राहतो असे म्हटले परंतु किराया दिला नाही. तसेच त्याने वादींना त्रास दिला. प्रतिवादी क्र.१ च्या त्रासाला कंटाळून व तो सदरची मालमत्ता ईतरांना हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे वादींनी त्याला दावा मिळकतीत हिस्सा मागितला. परंतु त्याने ते देण्याचे टाळले. वादी क्र.१ ही १०४ वर्षाची वयोवृध्द महिला आहे तर वादी क्र.२ ही ६० वर्षाची महिला असून दोन्ही आजारांनी ग्रस्त आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादीने त्यांना हाकलून दिल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होईल म्हणून त्यांना सदरचा दावा करणे भाग पडले. सबब, त्यांना प्रथम दर्शनी केस असल्यामुळे व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने असल्यामुळे त्यांना होणारे अपरिमीत नुकसाना टाळण्यासाठी त्यांच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम देण्यात यावा.

७. वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द वाटणीसाठी तसेच मनाई हुकुमासाठी आणलेला आहे. प्रतिवादींनी दाव्यामध्ये हजर होवून सुध्दा वादीच्या कथनांना खोडून काढणारा त्यांचा जबाब सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांना वादीची केस मान्य असल्याचा निष्कर्ष निघतो. वादीने तिच्या दाव्या सोबत केवळ प्रतिवादी क्र.१ च्या नावे दि.०७.०९.१९८७ रोजी झालेल्या खरेदीखताची प्रत सादर केलेली आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, सदरची मालमत्ता ही प्रतिवादी क्र.१ चे वडील याने त्यांना घशाचा कर्करोग असल्यामुळे व प्रतिवादी क्र.१ हा भविष्यातील कर्ता पुरुष असल्यामुळे त्याच्या नावे केली होती. परंतु आता तो त्यावर असलेल्या घरामधून वादींना हाकलू पाहत आहे व सदरची मालमत्ता तो त्याच्या नावे असल्याचा फायदा घेवून त्रयस्त व्यक्तींना विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. वाद मिळकत ही वडिलोपार्जीत मिळकत आहे किंवा नाही ही बाब आज रोजी वादातीत आहे. सदरची बाब शाबीत होण्यास निश्चीत वेळ लागणार तोपर्यंत वाद मिळकत विक्री होवू नये अथवा त्यमध्ये बदल होवू नये या करिता आदेश पारीत करण्यास न्यायालयास सर्वस्वी अधिकार आहे. किंबहुना तात्पुरता मनाई हुकूमाचा उद्देशच केवळ दावा मिळकत दाव्याचा मूळ निकाल लागे पावेतो आहे त्या स्थीतीत ठेवणे हा आहे. वादींच्या कथनांवरुन प्रथमदर्शनी मी या मताशी येत आहे की, दावा मिळकत ही प्रतीवादी क्र.१ च्या नावे असल्याने निश्चीतपणे तो ती त्रयस्त व्यक्तींना विकण्याच्या प्रयत्नात असणार आणि सदरची मालमत्ती ही त्रयस्त व्यक्तींना विक्री केल्यास दाव्यामध्ये विनाकारण गुंतागुंत निर्माण होईल व वादींना दावा घरामधुन त्यांचा हिस्सा प्राप्त होण्यास विलंब लागेल. आणखी असे की, दावा मिळकतीवर असलेल्या एका खोली मध्ये वादी हया राहत असल्यामुळे जर त्यांना प्रतिवादी क्र.१ याने हाकलून लावले तर निश्चीतपणे त्या वयोवृध्द असल्याने व त्यांना कोणतेही काम नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. त्यामुळे त्या बाबती संबंधी देखील मनाई हुकूम वादीच्या हक्कात देवविणे इष्ट होईल. एकंदरीत वरील विवेचनावरुन व प्रतिवादीने वादींच्या कथना विरोध न दर्शविल्यामुळे मी या मताशी येत आहे की, वादीच्या हक्कात तुर्तास मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी क्र.१ चे कोणतेही नुकसान संभवत नाही. किंबहूना त्यामुळे दावा मिळकतीचे विकण्यापासून संरक्षण होईल. सबब, विचारार्थ मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी असे नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.४ करीताः</u>**

८. मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तरार्थ वादीला प्रथमदर्शनी केस असून त्याच्या हक्कामध्ये मनाई हुकूम देणे जास्त उपयुक्त होईल असे निष्कर्ष नोंदविलेले आहे. करीता मी मुद्दा क्र.४

करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेः

**आ दे श**

| | |
|---|---|
| १) | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येते. |
| २) | प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी, तसेच त्यांच्या तर्फे त्यांचे नोकर, एजंट किंवा ईतर कोणीही दाव्याचा निकाल लागे पर्यंत प्लॉट क्र.४५ मालमत्ता क्र.१०–३–१३९ मौजे मुदखेड येथील असलेल्या घरातून वादी क्र.१ व २ यांना काढुन टाकू नये किंवा कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करु नये अथवा अडथळा आणू नये. |
| ३) | तसेच प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी, तसेच त्यांच्या तर्फे त्यांचे नोकर, एजंट किंवा ईतर कोणीही दाव्याचा निकाल लागे पर्यंत मौजे मुदखेड येथील प्लॉट क्र.४५ मालमत्ता क्र.१०–३–१३९ हा कोणासही विक्री अथवा हस्तांतरीत, गहाण करु नये व त्या मालमत्तेवर कोणताही चार्ज निर्माण करु नये. |
| ४) | या अर्जाचा खर्च मुळ दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यात यावा. |

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत.)

SIDDHARTH BHIMRAO DHEMBARE
Digitally signed by SIDDHARTH BHIMRAO DHEMBARE
Date: 2023.01.11 18:09:27 +0530

मुदखेड
दि. ०९/०१/२०२३

**( एस. बी. ढेंबरे )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मुदखेड
ता.मुदखेड, जि.नांदेड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | A. A. Totre |
| Court Name | : | CJJD, Mudkhed |
| Date: | | 09/01/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 09/01/2023 |
| Judgment/order Uploaded on | : | 09/01/2023 |